आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Jan. To March 2020
Issue-33, Vol-01 A

Date of Publication
03 Jan. 2020

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Savitribai College of Arts, Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar
ID. No. PU/AN/A/ 58/1999

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

55) A critical review on library Management system using IOT& Its Effectiveness
**Shital Gawade, Aniket Kothawale & Supriya Dhumal, Baramati(M.S.)** ||209

56) Knowledge Management: An Overview
**Prof. Padmaja B. Ubale, Pune** ||213

57) UNHEARD VOICES OF SUBALTERN WOMEN DEPICTED IN SHASHI DESHPANDE'S ...
**Dr. Kalyan D. Sonawane, Dist-Pune** ||216

58) Information Seeking Behavior in Digital Environment-A Study of students in ...
**Prof. Shahaji M. Takawane** ||219

59) संशोधन कार्यात संशोधन अहवालाचे महत्त्व
**दिपाली रामदास चिंचवडे, पुणे** ||223

60) ज्ञान व्यवस्थापन
**प्रा. महेश वसंत कुलकर्णी, जि. अहमदनगर** ||225

61) संशोधन कार्यात दुय्यम स्त्रोतांचे महत्त्व
**डॉ. सी. पी. हासे, पुणे** ||227

62) ग्रंथालय वेबसाईट निर्मितीसाठी उपलब्ध असलेले प्लेटफॉर्म: विशेष संदर्भ Wix.com Ltd
**स.प्रा. बर्फे विजय उत्तमराव, शहादा** ||229

63) Accounting and Financial Transformation in Traditional
**Dr. Anil Dattatraya Nagtilak,Prof. Dnyaneshwar Jambhulkar** ||232

64) शैक्षणिक ग्रंथालयामध्ये सामाजिक माध्यमाचा वापर
**श्री. दत्तात्रय शामराव पाटील** ||235

65) The Role of Ahmednagar in Civil Disobedience Movement
**Navanath Dattatraya Wajage** ||239

66) महाविद्यालयीन शिक्षणात ग्रंथालयाचे महत्त्व
**प्रा.डॉ. डी. एम. शेटे, पिंपळगाव पिसा** ||243

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com



Savitribai College of Arts ID. No. PU/AN/A/58/1999 Pimpalgaon Pisa, Ahmednagar

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

66

# महाविद्यालयीन शिक्षणात ग्रंथालयाचे महत्त्व

प्रा.डॉ. डी. एम. शेटे
मराठी विभाग प्रमुख,
सावित्रीबाई कला महाविद्यालय पिंपळगाव पिसा

**********

**प्रस्तावना**

ग्रंथालय म्हणजे सर्व प्रकारची सर्वसाधारण पणे छापील तसेच हस्तलिखित माहितीसाधने एकत्रितपणे ठेवण्याची जागा होय. प्राचीन भारतात ग्रंथालयांची संकल्पना नव्हती.ती भारतीयांनी ब्रिटिशांकडून घेतली. मध्ययुगीन काळामध्ये हस्तलिखित पोथ्या जतन करून ठेवल्या जात. राजे—महाराजे आपला स्वतंत्र ग्रंथसंग्रह ठेवत असत. ग्रंथालय शास्त्राचे तज्ज्ञ एस. आर. रंगनाथन यांच्या मते, ग्रंथालये ही लोकशाही मूल्य जोपासणारी सार्वजनिक संस्था आहे.एकोणिसाव्या शतकामध्ये सार्वजनिक शिक्षणाला पूरक ठरलेली चळवळ म्हणजे ग्रंथालय चळवळ होय. चळवळ हा शब्द या ठिकाणी ग्रंथालयांचा विकास या अर्थाने आहे.बडोदा संस्थानांमध्ये महाराज सयाजीराव गायकवाड यांनी या चळवळीद्वारे सार्वत्रिक शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार केला.

**ग्रंथालयांचे स्वरूप**

ग्रंथालय महाविद्यालयांचा आत्मा असतो. वाचक, वाचन साहित्य, कर्मचारी आणि विद्यार्थी हे ग्रंथालयाचे तीन घटक आहेत. महाविद्यालयीन शिक्षणाच्या गुणवत्तावाढीमध्ये ग्रंथालय फार मोठे योगदान आहे. कमीतकमी वेळेत योग्य ते वाचन साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी आणि ज्ञान साधनांचा वाढलेला आवाका, प्रकाशनांची प्रचंड उपलब्धता, माहितीतील वाढ, ग्रंथालयाच्या आर्थिक समस्या इ.सारख्या अनेक घटकांचा विचार करता विविध प्रकारच्या सेवांचे आयोजन ग्रंथालय करत असते.महाविद्यालयीन शिक्षण प्रणाली मध्ये प्राध्यापकांद्वारे केल्या जाणाऱ्या अध्यापनासोबत ग्रंथालयाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी व व्यक्तिमत्त्व विकासासाठी ग्रंथालयाचे योगदानही महत्त्वाचे आहे.ग्रंथालयातील ज्ञानभांडार विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनात रूपांतर करण्याच्या प्रक्रियेत ग्रंथपालांची भूमिका महत्त्वाची आहे. ग्रंथालयातून ही साधने वापरण्यासाठी नेता येतात व मर्यादित कालावधीत परत केली जातात. आधुनिक काळात ग्रंथालयांची संकल्पना बदलून ते माहितीचे देवाण—घेवाण करणारी संस्था अशी झाली आहे.

**ग्रंथालयांचा मूळ उद्देश**

ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या साहित्यांचा अधिकाधिक वापर करण्यास शिक्षक आणि विद्यार्थी यांना प्रवृत्त करणे.

शिक्षक आणि विद्यार्थी यांना आवश्यक त्या ग्रंथालय सेवा उपलब्ध करून देणे.

शिक्षक आणि विद्यार्थ्यांना संदर्भासहित वाचनाची सवय लागते.

**नवनवी ज्ञान व माहिती ग्रंथालयाने संग्रहित करणे.**

ग्रंथालयाचा अधिकाधिक वापर होणे ही आजची शैक्षणिक गरज आहे. केवळ पाठयपुस्तकांतून दिल्या जाणाऱ्या शिक्षणातून महाविद्यालयीन शिक्षणाची उद्दिष्टये साध्य होऊ शकत नाहीत. त्या भागविण्याचे कार्य ग्रंथालय विधिध सेवांच्या आणि उपक्रमांच्या द्वारे पार पाडू शकते. ग्रंथालयाने विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावून त्यांना आवश्यक ते साहित्य उपलब्ध करून दिले आणि त्याचा वापर करण्याचे शिक्षण दिले तर विद्यार्थ्यांमध्ये स्वाभाविकच ज्ञानार्जनाची आवड निर्माण होते. म्हणून आजच्या शिक्षणात विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा वापर करण्याची संधी प्राप्त करून देऊन त्यांची ज्ञानार्जनाची, जिज्ञासापूर्तीची नैसर्गिक भूक भागविण्याचे कार्य महाविद्यालयीन ग्रंथालय करत असते. ग्रंथालयाच्या या कार्याचे यश विद्यार्थी ग्रंथालय साहित्याचा वापर किती व कसा करतात यावर अवलंबून असते. म्हणूनच विद्यार्थ्यांना आवश्यक ते साहित्य उपलब्ध करून देऊन त्याचा वापर करण्याचे शिक्षण ग्रंथालय विद्यार्थ्यांना



Savitribai College of Arts
ID. No. PU/AN/A/ 58/1999
Pimpalgaon ... Ahmednagar
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

देत असते.

ग्रंथालय साहित्याचा संग्रह करताना जी उद्दिष्टये डोळ्यासमोर ठेवलेली असतात ती पुरी करण्यासाठी ग्रंथालयाचे स्वरूप कसे असावे या संबंधी निर्णय घेणे आवश्यक असते.ग्रंथालयाचे यश विद्यार्थी व शिक्षकांना ग्रंथालय साहित्याचा वापर करण्याची संधी किती आणि कशी मिळते यावर अवलंबून आहे.विद्यार्थी आणि शिक्षक यांना ग्रंथालय साहित्याचा अधिकाधिक वापर करण्याची संधी देणे हे ग्रंथालयाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. ग्रंथालयाचा वापर करण्यासाठी विद्यार्थ्यांना अधिक वेळ दिला, शिक्षकांनी जर विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन केले आणि ग्रंथपालाने जर आपल्या ग्रंथालयात चांगले ग्रंथालय साहित्य उपलब्ध करून दिले तर ग्रंथालयाचा वापर निश्‍चितच चांगला होतो.हा वापर अधिकाधिक होण्यासाठी ग्रंथपालाने ग्रंथ देवघेव, संदर्भ सेवा, ग्रंथालय तास यासारख्या सेवांचा आणि काही विशेष उपक्रमांचा अवलंब करावयास हवा.

**ग्रंथ देवघेव—** विद्यार्थ्यांना ग्रंथ घरी वाचायला देणे हे ग्रंथालयाचे एक महत्त्वाचे शैक्षणिक कार्य आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करून ती वाढीला लावण्यासाठी या ग्रंथ देवघेव सेवेची फार गरज आहे आणि ती गरज प्रसिद्ध ग्रंथालय शास्त्रज्ञ डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी संदर्भ सेवेसंबंधी लिहिताना म्हटले आहे. ''नेमका वाचक नेमके पुस्तक किंवा वाचन साहित्य यांची योग्य वेळी सांगड घालून देण्याचे योग्य त्या व्यक्तिगत पातळीवरून केलेले प्रयत्न म्हणजे संदर्भ सेवा''. अमेरिकन लायब्ररी असोसिएशनने प्रसिद्ध केलेल्या ग्रंथालयशास्त्राच्या परिभाषा कोशात संदर्भ सेवेसंबंधी म्हटले आहे, ''अभ्यासात आणि संशोधनासाठी ग्रंथालयीन वाचन साहित्यातून माहिती शोधण्यासाठी वाचकांना प्रत्यक्षपणे दिलेले व्यक्तिगत सहकार्य म्हणजे संदर्भ सेवा''. या आणि इतर तज्ज्ञांनी केलेल्या व्याख्यांचा मथितार्थ एकच आहे. तो हा की वाचकाला हवी असलेली नेमकी माहिती महाविद्यालयीन सर्व वर्गासाठी आठवडयातून कमीत कमी एका ग्रंथालय तासाची सोय असली तर त्या तासात ग्रंथालयातील पुस्तके विद्यार्थ्यांना वाचायला मिळू शकतात. या तासात विद्यार्थ्यांना ग्रंथ घरी वाचायला देण्याचे कामही करता येते. या तासाचा उपयोग विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी ग्रंथपालाला आणि वर्गशिक्षकांना करता येतो. मधल्या सुट्टीत वाचन— शाळेच्या दिनचर्येत विद्यार्थ्यांना रिकामा वेळ असा फार कमी मिळतो यामुळे ज्या विद्यार्थ्यांना वाचनाची हौस असते त्यांना ती वेळेअभावी भागवता येत नाही, अशा विद्यार्थ्यांना वाचनाचा लाभ द्यावा म्हणून येणारी मासिके व वृत्तपत्रे विद्यार्थ्यांना शाळेच्या वेळेत इच्छा असूनही वेळेअभावी वाचता येत नाहीत. त्यामुळे त्यांचा पाहिजे तेवढा उपयोग केला जात नाही. वास्तविक नियतकालिके आणि वृत्तपत्रे यांचे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी वाचन करणे शैक्षणिकदृष्टया महत्त्वाचे आहे म्हणून विद्यार्थी या चांगल्या वाचन साहित्यापासून वंचित राहू नयेत म्हणून ग्रंथालयाने विद्यार्थ्यांना ती मधल्या सुट्टीत किंवा शाळा सुटल्यावर विद्यार्थ्यांना परीक्षेतील यशाची चिंता असते. या विद्यार्थ्यांचा त्यांच्या परीक्षेच्या दृष्टिकोनातून शालेय ग्रंथालयाने विचार करून त्यांना त्यांच्या अभ्यासात जेवढी मदत करता येईल तेवढी केली पाहिजे.त्यांना अभ्यासोपयोगी पुस्तके आणि इतर साहित्य उपलब्ध करून देऊन त्या साहित्याचा त्यांना वापर करता यावा म्हणून महाविद्यालयाच्या वेळेबाहेर त्यांची वाचनाची खास सोय केली पाहिजे. ज्या विद्यार्थ्यांच्या घरी अभ्यासाची सोय नसते, अशा विद्यार्थ्यांना ग्रंथालयाच्या या उपक्रमाचा निश्‍चितच फायदा होतो. महाविद्यालयीन बरेच विद्यार्थी बाहेरच्या विशेष परीक्षांना बसतात. त्यापैकी काहीची या परिक्षांसाठी लागणारी पुस्तके खरेदी करण्याची ऐपत नसते.अशा विद्यार्थ्यांना परिक्षांना बसायला उत्तेजन देऊन त्यांना लागणारी पुस्तके व इतर साहित्य ग्रंथालयाने उपलब्ध करून द्यावे. शाळेतील विद्यार्थ्यांचे या परीक्षेतील यश शाळेला निश्‍चितच भूषणावह असते आणि या यशातील ग्रंथालयाचा वाटा महत्त्वाचा असतो. ग्रंथपालाने विविध अभ्यासक्रमांची आणि व्यवसायाची माहिती देणारी पुस्तके आणि माहितीपत्रके विद्यार्थ्यांना ग्रंथालयात उपलब्ध करून द्यावीत. ग्रंथालयातील साहित्याचा विद्यार्थ्यांना परिचय करून देऊन त्याचा दैनंदिन अभ्यासासाठी वापर कसा करावा याचे शिक्षण ग्रंथपालाने त्यांना द्यावे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना त्यांचे छंद, आवडी



Savitribai College of Arts
ID. No. PU/AN/A/ 56/1999
Dist. Ahmednagar
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

जोपासण्यासाठी अवांतर वाचनासाठी ग्रंथालयाचा वापर कसा करावा याचीही माहिती त्यांना द्यावी. विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा वापर करण्याची सवय लावणे किती महत्त्वाचे आहे हे प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ डॉ. ग. श्री. खैर यांनी आपल्या 'ग्रंथालय सवय' या लेखात सांगितले आहे. मुक्त प्रवेश किंवा मुक्तद्वार पद्धत— मुक्तद्वार किंवा मुक्त प्रवेश पद्धतीत वाचक स्वत: ग्रंथसंग्रह कक्षात जाऊन आपल्याला हव्या असलेल्या ग्रंथाची निवड करू शकतो. ग्रंथाचा अधिकाधिक वापर होण्याच्या दृष्टीने ही एक आदर्श पद्धती आहे. डॉ. रंगनाथन यांच्या पंचसूत्रातील 'ग्रंथ वापरासाठी आहेत', 'प्रत्येक वाचकाला त्याचा ग्रंथ मिळाला पाहिजे', 'प्रत्येक ग्रंथाला त्याचा वाचक मिळाला पाहिजे' आणि 'वाचकांचा वेळ वाचावा'या सूत्रांची परिपूर्ती ग्रंथालय प्रसिद्धी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ग्रंथालयाकडे आकृष्ट करून त्यांना वाचायला प्रवृत्त करण्यासाठी आणि ग्रंथालय कोणत्या सेवा देते याची माहिती करून देण्यासाठी ग्रंथालय प्रसिद्धीची फार गरज असते. ग्रंथालयाची वैशिष्टये, त्याची आकर्षणे, ग्रंथालय देत असलेल्या सेवा यांची प्रसिद्धी ग्रंथापालाला पुढील मार्गानी करता येते. उदा. ग्रंथप्रदर्शनि, ग्रंथवेष्टने, सूचना—फलक किंवा प्रकटन—फलक, विशेष दिवसांची ग्रंथालयशास्त्राचे पाच सिद्धांत आणि शालेय ग्रंथालये— जागतिक कीर्तीचे ग्रंथपाल आणि भारतीय ग्रंथालय चळवळीचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी ग्रंथालय शास्त्रांविषयी आणि ग्रंथालयाविषयी अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्यांचा अभ्यास केला पाहिजे.

**निष्कर्ष**

आजचे ग्रंथालय हे आधुनिकतेकडे वळलेले असावे.माहितीचे आदान प्रदान झाले पाहिजे. पुस्तकाच्या माध्यमातून मिळालेले ज्ञान इतरांपर्यंत पोहोचिवण्याचे काम झाले पाहिजे. ग्रंथांच्या व्याख्या आज बदलत आहे. त्यानुसार ग्रंथालयाने बदल स्विकारले पाहिजे. डिजिटल युगातही ग्रंथालयाचे महत्व अनन्यसाधारण आहे.ग्रंथालयांनी आता विकासाच्या दृष्टीने पाऊल टाकले पाहिजे. संगणकाचा वापर करुन जास्तीत जास्त विद्यार्थांना संगणक साक्षर व सुसंस्कृत केले पाहिजे.

माणसाची परिभाषा बदलत गेली. त्याचप्रकारे साहित्यही बदलत गेले.काळाप्रमाणे माणसानेही बदल स्वीकारणे गरजेचे आहे. डिजिटल युगात आपण वाचतो, पाहतो, पण लक्षात किती राहते हा महत्वाचा प्रश्न आहे. पण आपण ग्रंथाचे वाचन केले तर कायम लक्षात राहते. प्रत्येक पालकाने आपल्या पाल्यांला मोबाईल घेऊन न देता वाचनासाठी पुस्तके घेवून दिली पाहिजे. वाचनाचे संस्कार आले नाही तर आपण आजच्या युगात जगू शकणार नाही. आजची पिढी ही डिजिटल झाली आहे. ज्ञानाच्या कक्षा वाढल्या आहेत. डिजिटलमुळे सर्व जग जवळ आले आहे. जग कितीही बदलले असले तरी ग्रंथाचे महत्व कमी झालेले नाही. ग्रंथालयाचे स्वरुप आज बदलले आहे. ते आज ज्ञानाचे मंदिर झाले आहे. ज्ञानरुपी या मंदिराचे महत्व दिवसेंदिवस वाढतच आहे.

**संदर्भ:**

१: कुंभार राजेंद्र (२०१३) महाविद्यालईन व विद्यापीठीय ग्रंथालये—नाशिक:वाय.सी.एम. विद्यापीठ

२: आढाव उद्धव (२००१) महाविद्यालयीन ग्रंथालयाचा समन्वय, मैत्रीच्या पलीकडे

३ : कुंटूरकर वि. ना.(१६८४) महाविद्यालयीन ग्रंथालयाचे प्रश्न आणि उपाय.ग्रंथपरीवार.

४: कर्णिक प्रदीप (२००५)ग्रंथ ग्रंथालय ग्रंथ संस्कृती, मुंबई—नवचौतन्य प्रकाशन.

❑❑❑



Savitribai College of Arts ID. No. PU/AN/A/58/1999 ... Dist. Ahmednagar

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar